निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९० वा.
शनिवार - १३ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## संक्षिप्त



## सी. पी. राधाकृष्णन यांचा भारताचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथविधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांना आज राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडपम येथे पदाची शपथ दिली.



या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, अनेक केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानसभाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

# नेपाळमध्ये राजकीय उलथापालथ; 'सुशीला कार्की' नव्या पंतप्रधान

**आत्ताच एक्सप्रेस**

**नेपाळ/ वृत्तसेवा/** नेपाळमधील आंदोलनानंतर तेथील राजकीय स्थित्यंतरे बदलली असून सत्तांतर झाल्याचं पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावरील बंदी निमित्त ठरल्यानंतर झालेल्या आंदोलनात आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेत पंतप्रधानांसह अनेक मंत्र्यांवर हल्लाबोल केल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, नेपाळचे माजी पंतप्रधान केपी ओली शर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत पळ काढला होता. त्यानंतर, नेपाळच्या पंतप्रधानपदावर कोण विराजमान होणार याची चर्चा जगभरात होती. आता, नेपाळच्या पंतप्रधानपदासाठी (झीळाश ळाप-ळींीशी) सुशीला कार्की यांची निवड करण्यात आली आहे. नेपाळमधील जेन झी आंदोलनाचे नेते बालेन शाहा यांचे नाव पंतप्रधानपदासाठी आघाडीवर होते, पण सुशीला कार्की यांची वर्णी लावली आहे.



नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी सुशीला कार्की यांना पंतप्रधानपदाची शपथ दिली. पौडेल यांनी नेपाळच्या तिन्ही प्रमुख राजकीय पक्षाच्या प्रमुखांना बोलावून प्रतिनिधी सभा बरखास्त करत असल्याचे सांगितले. तसेच, सुशीला कार्की ह्या पंतप्रधानपदाची शपथ घेतील, अशी घोषणाही त्यांनी केली होती. त्यानुसार, सुशीला कार्की यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून राष्ट्रपतीकडून त्यांचा शपथविधी संपन्न होत आहे.

सुशीला कार्की ह्या माजी सरन्यायाधीश असून देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान ठरल्या आहेत. नेपाळच्या पंतप्रधानपदासाठी दिवसभर झालेल्या प्रतिनिधी सभेतून अखेर सुशीला कार्की यांच्या नावावर सर्वांचे एकमत झाल्यानंतर नेपाळच्या नव्या पंतप्रधानांच्या नावाची घोषणा झाली. पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर आंदोलकांच्या मागण्यांची पूर्तता करत त्या पुन्हा निवडणुकांसाठी सज्ज होतील.

**नेपाळमध्ये हिंसाचार, पंतप्रधानांचा राजीनामा**

नेपाळचे माजी पंतप्रधान केपी ओली शर्मा यांच्या सरकारविरुद्ध जनतेमध्ये तीव्र असंतोष होता. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरुन विरोधकांनी सरकारला घेरले असतानाच, सोशल मीडियावरील बंदी सरकार उलथवण्यासाठी कारणीभूत ठरली. येथील संतापजनक आंदोलनादरम्यान अनेक शहरांत हिंसाचार झाला. संसद भवन, नेत्यांची निवासस्थाने आणि सरकारी कार्यालयांवर आंदोलकांनी तोडफोड केली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही युवकांचा मृत्यू झाल्याने परिस्थिती अधिकच चिघळली.

त्यामुळे ओलींवर सतत दबाव वाढत होता. याआधीच गृहमंत्री आणि कृषिमंत्र्यांनी राजीनामा सादर केला होता. अखेर ओलींनाही सत्ता सोडावी लागली. त्यामुळे, नेपाळचे नवे पंतप्रधान कोण अशी चर्चा सुरू झाली. त्यावेळी, बालेन शाह, कुलमान घिसिंग यांचीही नावे समोर आली होती. मात्र, सुशीला कार्की यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

## वस्तू व सेवा कर संकलनात महाराष्ट्राचा २१ टक्के वाटा-मुख्य आयुक्त के. आर. उदय भास्कर




आत्ताच एक्सप्रेस

मुंबई/प्रतिनिधी/ देशातील जीएसटी संकलनात वाढ होत आहे. महाराष्ट्राचा वाटा यामध्ये २१ टक्के असल्याचे सीजीएसटीचे प्रधान मुख्य आयुक्त के. आर. उदय भास्कर यांनी येथे सांगितले.

वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (AIAI) यांच्या संयुक्त विद्यमाने जीएसटी २.० : विकसित भारताचा मार्ग या विषयावर विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी के. आर. उदय भास्कर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर, राज्यकर विभाग आयुक्त आशीष शर्मा, डब्ल्यूटीसी (WTC) व एआयएआयचे (AIAI) अध्यक्ष विजय कलंत्री व यांच्या सह संबंधित उपस्थित होते.के. आर. उदय भास्कर म्हणाले की, करदात्यांचे प्रमाण २०१७ मधील ६६.५ लाखांवरून २०२५ मध्ये १.५३ कोटींवर पोहोचले असून महसूल संकलन २२.०८ लाख कोटींच्या उच्चांकावर गेले आहे. महाराष्ट्राचा वाटा यामध्ये २१ टक्के (७.५ लाख कोटी) आहे. सुधारणा संरचनात्मक, दरांचे तर्कसंगतीकरण आणि जीवनमान सुलभता या तीन स्तंभांवर आधारित असल्याचे त्यांनी नमूद केले.आयुक्त आशीष शर्मा म्हणाले, दर तर्कसंगतीकरणामुळे शुल्क रचना दुरुस्त होऊन 'एमएसएमई' क्षेत्राला मोठा लाभ होईल.टीसीएन ग्लोबलच्या (TCN Global) अनिंदिता चॅटर्जी यांनी नफा-नियंत्रण यंत्रणा (anti-Profiteering) तातडीने लागू करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. करतज्ज्ञ रागिनी तुलसियन यांनी उद्योगांना करसमाविष्ट करार व लेखापुस्तकांचे पुनर्संतुलन याकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला.डब्ल्यूटीसी मुंबई व एआयएआयचे अध्यक्ष विजय कलंत्री, यांनी एमएसएमई क्षेत्राचे ३० टक्के जीडीपीतील योगदान आणि ६० टक्के रोजगारातील भूमिका अधोरेखित केली. कर दर कपातीमुळे मागणीत वाढ होऊन उद्योगक्षेत्र स्पर्धात्मक होईल असे त्यांनी सांगितले.या सत्रात केंद्र व राज्यातील वरिष्ठ कर अधिकारी, करतज्ज्ञ, व्यावसायिक समुदायाचे सदस्य व मान्यवर सहभागी झाले. संगीता जैन, वरिष्ठ संचालक, AIAI, यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# मराठवाडा विभागातील आदिवासी आश्रमशाळांची स्थिती अत्यंत चिंताजनक

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी /** अवजड मृत्यू आणि आरोग्य समस्या महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये गेल्या १० वर्षांत ७४० हून अधिक विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, ज्यामध्ये कुपोषण, आरोग्य सेवा अभाव आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.अत्यंत खराब वास्तव्य आणि स्वच्छता:मराठवाडयातील अनेक शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना गादी, पलंग, टेबल, खुर्ची यांसारख्या मूलभूत वस्तू उपलब्ध नाहीत. विद्यार्थ्यांना एकाच खोलीत झोपणे, जेवणे आणि शिकणे भाग पडते. शाळेच्या इमारतीची स्थिती अत्यंत जीर्ण आहे, आणि मुलींसाठी केवळ दोन शौचालये उपलब्ध आहेत.तर मुलांसाठी अनेक आश्रम शाळेत शौचालये उपलब्ध नाहीत.जे आहेत ते दुरूस्ती करता आहेत.त्यामुळे आदिवासी मुलां/मुलींना उघड्यावर शौचालस बसण्याची वेळे येते आहे.काही आश्रमशाळात शौचालयास पाणी ,स्वाच्छाता नसल्याने उघड्यावर शौचालस बसण्याची वेळे येत हे वास्तव गंभिर आहे.

शिक्षणाच्या मूलभूत सुविधांचा अभाव: आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अनेक शाळांमध्ये फर्निचर, शौचालये, ग्रंथालये, संगणक प्रयोगशाळा, खेळाचे मैदान आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा यांचा अभाव दिसुन येतो.अन्नपदार्थ आणि विषबाधा नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील एका आश्रमशाळेत ५१ विद्यार्थिनींना विषबाधेची लक्षणे दिसून आली, ज्यामुळे स्थानिक प्रशासन आणि आरोग्य विभागाने तातडीने हस्तक्षेप केला.छत्रपती संभाजीनगरमध्ये खुलताबाद तालुक्यातील तिसगांव आश्रमशाळेत अनेक विद्यार्थिनींना विषबाधेची लक्षणे दिसून आली, ज्यामुळे आरोग्य विभागाने तातडीने हस्तक्षेप केला.



जतवाडा आश्रमशाळा (जालना) या शाळेची इमारत भाड्याने घेतलेली आहे, ज्यात तीन वर्गखोली आहेत. इमारतीची स्थिती चांगली आहे, परंतु इतर सुविधा याबद्दल माहिती उपलब्ध नाही.धवाडा आश्रमशाळा (जालना) या शाळेत दोन इतर खोल्या आहेत, आणि मुख्याध्यापक/ शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली आहे. वर्गखोल्यांची स्थिती चांगली आहे, परंतु इतर सुविधा याबद्दल माहिती उपलब्ध नाही.

**या शाळांमध्ये मूलभूत सुविधा, आरोग्य, सुरक्षा आणि शिक्षणाच्या बाबतीत गंभीर कमतरता**

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने पनवेल येथील आश्रमशाळेच्या दुर्दशेवर राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. बॉम्बे उच्च न्यायालयाने देखील आश्रमशाळांतील ८० अनैसर्गिक मृत्यूंबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांना शाळांची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

**सुधारणा आणि उपाययोजना**

शाळांच्या कामकाजावर कडक नियंत्रण ठेवणे आणि नियमित निरीक्षणे करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांना गादी, पलंग, टेबल, खुर्ची, शौचालये, ग्रंथालये आणि संगणक प्रयोगशाळा यांसारख्या मूलभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे.शाळांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करणे आणि नियमित आरोग्य तपासण्या आयोजित करणे.शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करणे आणि विद्यार्थ्यांसाठी योग्य शिक्षण साहित्य उपलब्ध करणे.मराठवाड्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी ही स्थिती चिंताजनक आहे. प्रशासनाने तातडीने या समस्यांवर उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे जानकारांचे मत आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासी विकास विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (आदिवासी) यांच्या सहकार्याने आदिवासी भागांतील पायाभूत सुविधा उभारणीसाठी विविध प्रकल्प राबवले जात आहेत. तथापि, या विभागांच्या कार्यप्रणालीमध्ये काही आव्हाने आणि अडचणी देखील आहेत.**

नियमित देखभाल आणि दुरुस्तीची कमतरता आहे.तर बांधकाम विभागाची अनेक कामे कार्यध्यसच्या मुदतीत पुर्ण होत नाहीत यामुळे आमरावती व नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीची कमतरता असल्याने रस्त्यांच्या देखभालीसाठी आवश्यक असलेली वार्षिक देखभाल करार मंजूर होऊ शकलेली नाही. यामुळे पॅचवर्क, साइनबोर्ड आणि इतर देखभाल कार्ये थांबली आहेत.आणि आदविासी विभागाने निधी न दिल्याने अनेक आश्रमशाळात शौच्छालय,पाणी व वर्ग खोल्या नवीन करता येत नसल्याचे बोलेले जात आहे.

राज्य सार्वजनिक बांधकाम विभागावर सुमारे ३६,००० कोटींची थकबाकी आहे. विभागाने १०,००० कोटींच्या थकबाकीची मागणी केली होती, परंतु फक्त २,४०० कोटींचा निधी मिळाला आहे. यामुळे नवीन प्रकल्प सुरू करण्यास अडचण येत आहे.

प्रकल्पांच्या वेळेवर अंमलबजावणीसाठी नियमित निधीची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.प्रकल्पांच्या वेळेवर अंमलबजावणीसाठी प्रभावी प्रकल्प व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.स्थानिक आदिवासी समुदायांचा सहभाग वाढवून प्रकल्पांच्या अंमलबजावणीला गती देणे आवश्यक आहे.महाराष्ट्रातील आदिवासी भागांतील पायाभूत सुविधा उभारणीसाठी प्रशासनाने अधिक प्रभावी योजना आणि अंमलबजावणी प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळांमधील दुर्दशेची बाब अत्यंत गंभीर आहे. या संदर्भात आदिवासी विकास विभागाचे मंत्री आणि संबंधित प्रशासनाने अनेक वेळा दुर्लक्ष केले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षा आणि शिक्षणाच्या बाबतीत गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे.**



मराठवाड्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळांमधील या गंभीर परिस्थितीबद्दल आदिवासी विकास मंत्री आशोक उईके यांनी जून २०२५ मध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसोबत एक दिवस शाळेत घालवण्याचे ठरवले होते. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यावर उपाययोजना करणे होता.

तथापि, या उपक्रमानंतरही शाळांमधील मूलभूत सुविधांचा अभाव आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या बाबतीत सुधारणा झाल्याचे दिसून आलेले नाही. यामुळे प्रशासनाच्या वचनबद्धतेबद्दल प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

मराठवाड्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळांमधील दुर्दशा ही केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षाचेच परिणाम नाही, तर त्यात राजकीय इच्छाशक्तीचा आणि संसाधनांच्या योग्य वितरणाचा मोठा सहभाग आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना न केल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी गंभीर परिणाम होऊ शकतात.प्रशासनाने या शाळांमधील मूलभूत सुविधांचा अभाव दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या बाबतीत योग्य काळजी घेणे आणि त्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक पावले उचलणे आवश्यक आहे.

## आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे-मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभातीनगर/ प्रतिनिधी /** मुंबइ राज्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी बाधितांना ७३ कोटी ९१ लाख ४३ हजाराच्या मदतीस राज्य शासनाने मान्यता दिली असून या बाबतचे शासन निर्णय जारी करण्यात आले असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्तीत बाधित शेतकऱ्यांना मदत आणि दिलासा देण्यास शासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. शासनाने बाधित पिकांचे तातडीने पंचनामे ही मदत देण्याच्या घेतलेल्या या निर्णयामुळे अतिवृष्टी व अवकाळी पाऊस या आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना उभारी मिळेल, असा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

ही मदत देण्यास मान्यता देण्यात आलेल्या कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये जून २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना ३७ लाख ४० हजार रुपये तर नागपूर, वर्धा, चंद्रपूर, हिंगोली आणि सोलापूर जिल्ह्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत शेत पिकांच्या नुकसानीपोटी ७३ कोटी ५४ लाख ३ हजार मदतीचा समावेश असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

जून २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी रायगड जिल्ह्यातील ९८० बाधित शेतकऱ्यांच्या ५५.६५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ११ लाख ८१ हजार रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ५६० शेतकऱ्यांच्या ७१.५४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२ लाख ९६ हजार रुपये आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३३५ शेतकऱ्यांच्या ५०.६४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२ लाख ६३ हजार रुपये असे १ हजार ८७५ शेतकऱ्यांच्या १७७.८३ हेक्टरवरील बाधित झालेल्या पिकांसाठी मदत म्हणून ३७ लाख ४० हजार रुपये इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे.

**नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित पिकांच्या नुकसानीपोटी ७३ कोटी ९१ लाख ४३ हजाराच्या मदतीस मान्यता**



विभागीय आयुक्त नागपूर यांनी पाठवल्या २१ जुलै २०२५ च्या प्रस्तावानुसार नागपूर जिल्ह्यात जून २०२५ मध्ये १ बाधित शेतकऱ्याच्या ०.४० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९ हजार रुपये तर जुलै २०२५ मधील नुकसानीच्या मदतीसाठी १८ ऑगस्ट २०२५ रोजी पाठविलेल्या प्रस्तावानुसार नागपूर जिल्ह्यातील ७ हजार ४५० शेतकऱ्यांच्या ४५५९.६२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३९२.८३ लाख रुपये. वर्धा जिल्ह्यात जून २०२५ मध्ये ८२१ शेतकऱ्यांच्या ४८५.८० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४१.५४ लाख, तर जुलै २०२५ मधील नुकसानीच्या मदतीसाठी २ हजार ८२७ शेतकऱ्यांच्या २२२४.९१ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १८९.२२ लाख, चंद्रपूर जिल्ह्यात जून व जुलै २०२५ मधील नुकसानीच्या मदतीसाठी १३ हजार ७४२ शेतकऱ्यांच्या ८६२१.०६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७३३.०० लाखाच्या मदतीचा समावेश आहे.

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून हिंगोली जिल्ह्यात जुलै २०२५ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मदतीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार ३९६ शेतकऱ्यांच्या २१५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १८.२८ लाखाच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून सोलापूर जिल्ह्यात जुलै २०२५ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मदतीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार ५९ हजार ११० शेतकऱ्यांच्या ५६ हजार ९६१.७३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ५९७९.१७ लाखाच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.

## लाडकी बहीण योजनेच्च सरकारकडून जोरदार समर्थन

राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र सादर करत लाडकी बहीण योजनेमुळे राज्याचा आर्थिक नुकसान होत असल्याचे आरोप फेटाळून लावले आहे. नागपूरचे सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी लाडकी बहीण योजना तसेच लाभार्थ्यांना रोख रक्कम दिली जाते, अशा इतर योजनांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याचे आरोप करत नागपूर खंडपीठात एक याचिका दाखल केली होती. त्यात लाडकी बहीण योजना आणि त्यासारख्या रोख रकमेचा लाभ देणाऱ्या इतर योजना बंद करण्यात याव्या, अशी मागणी करण्यात आली होती.

दरम्यान, त्याच याचिकेसंदर्भात राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र सादर केले आणि त्यामध्ये लाडकी बहीण योजनेमुळे राज्याचे अर्थव्यवस्थेला कुठलाही नुकसान होत नाही, असा दावा केला आहे. तसेच राज्य सरकारची वित्तीय तूट मर्यादेत असल्याचा दावाही केला आहे.

मिळलेल्या माहितीनुसार, वडपल्लीवार यांनी केलेल्या याचिकेत फायनान्शिअल रिस्पॉन्सिबिलिटी बजेट मॅनेजमेंट क्ट चा उल्लेख करत त्यामध्ये राज्याची वित्तीय तूट नेहमीच ३% च्या खाली असायला हवी, असा उल्लेख ही करण्यात आला होता. त्याला उत्तर देताना राज्य सरकारने २०२४-२५ मध्ये राज्याची वित्ती तूट ३% पेक्षा खाली म्हणजेच २.६९% असल्याचा दावा करण्यात आला आहे. अशातच राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेचे उच्च न्यायालयात जोरदार समर्थन केले आहे. सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी दाखल केलेल्या याचिकेला फेटाळून लावण्याची विनंती सरकारने केली आहे.

वडपल्लीवार यांनी राज्यावर आठ लाख कोटींपेक्षा जास्त कर्ज असून वित्तीय तूट वाढत असल्याचा दावा करत रोख रकमेचा लाभ देणाऱ्या योजना बंद करण्याची मागणी केली होती. यावर सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे राज्याची आर्थिक स्थिती चांगली असल्याचा दावा केला आहे. सरकारने म्हटले आहे की, महाराष्ट्राची वित्तीय स्थिती २.६९% असून कायद्यानुसार तीन टक्के वित्तीय तूट ठेवता येते. २०२४-२५ या वर्षासाठी राज्याची वित्तीय तूट २.६९% असून ती FRBM[2] कायद्यानुसार निर्धारित ३% मर्यादेत आहे. वित्तीय तूट तीन टक्क्यांपेक्षा कमी असणाऱ्या टॉप तीन राज्यांमध्ये महाराष्ट्र आहे. याचिकाकर्त्यांचे आकडे दिशाभूल करणारे असून याचिका फेटाळून लावण्यासोबतच त्यांना दंड ठोठावण्याची मागणीही सरकारने केली आहे.

## रवींद्रनाथ टागोरांच्या सर्वच साहित्यिकृती आंतराष्ट्रीय सुसंवादी मुक्त विद्यापीठ यशवाणी रेडिओवरील परिसंवादाचा सूर

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेबरेडिओवर थोर साहित्यिक जीवन परिचययाबरोबरच त्यांच्या लेखनावर आपले मुद्देसूद विचार व्यक्त केले. दुसऱ्या परिसंवादक डॉ. ज्योती दोंदे यांनी गुरुदेव रवींद्रनाथांच्या लेखन शैलीचा या मानवता, नैतिकता, निसर्ग व तत्त्वज्ञानाच्या परिघात आंतरराष्ट्रीय सुसंवादी असल्याचा सूर सर्व परिसंवादकांच्या चर्चेतून उमटला. दृकश्राव्य केंद्राचे



गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यकृतींविषयी परिसंवाद संपन्न झाला. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून व विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने विविधरंगी विषयांच्या कार्यक्रमांअंतर्गत हे बारावे पुष्प झाले.

त्यात विद्यापीठाच्या शैक्षणिक संयोजक डॉ. विद्या अहिरे यांनी गुरुदेव टागोरांच्या सविस्तर आढावा घेतला. तिसऱ्या परिसंवादक डॉ. मंजुश्री नेव्हल यांनी गुरुदेव रवींद्रनाथांच्या लिखाणातील प्राचीन ऐतिहासिक भारतीय ज्ञान परंपरा अभ्यासपूर्ण शैलीत प्रतिपादित केली.चौथ्या परिसंवादक श्रीमती ज्योती पाटील यांनी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या लेखनातील साम्य व भेद अधोरेखित केला. एकूणच गुरुदेव टागोरांच्या सर्वच साहित्यिकृती प्रमुख डॉ. जयदीप निकम यांचे मार्गदर्शन लाभले.

अध्यासनाचे समन्वयक प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल पगारे, दृकश्राव्य केंद्राचे तंत्रज्ञ गिरीश गवळी, प्रकाश सापनर यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रम श्रवण करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# सातारा गॅझेट,हैदराबाद गॅझेट व विश्वकर्मा योजना;यात कलार-कलाल समाज पारंपरिक व्यवसायाठी नियमानुसार अनुकूल

मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट व सातारा गॅझेट नुसार आरक्षण देण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे आणि त्या पध्दतीने कार्य सुरू आहे.याच आधारावर बंजारा समाजाने सुध्दा आरक्षणामध्ये उडी घेतली असून बंजारा समाजाला एस टी संवर्गात आरक्षण द्यावे यासाठी कंबर कसली आहे. कारण आज वाढता शिक्षणाचा खर्च,वाढती महागाई व बेरोजगारी यामुळे सर्वच समाजाच्या गरीब व मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडले असुन हताश झाले आ-हेत.त्यामुळे आज बंजारा समाजासह अनेक समाज हैदराबाद गॅझेट व सात-ारा गॅझेटच्या माध्यमातून आरक्षण किंवा आपला पारंपरिक व्यवसाय मिळण्याच्या दृष्टीने धडपड सुरू आहे. महत्वाचे म्हणजे सातारा गॅझेट ब्रिटिश काळातील (१८२०-१८३०) सातारा प्रांतातील जमीन,शेती, व्यवसाय,जाती आणि महसूल यांच्या नोंदीचा ऐतिहासिक पुरावा कलार-कलाल समाजासाठी महत्वाचा ठरेल.त्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट म्हणजे ब्रिटीश काळातील एक सरकारी राजपत्र आहे.या गॅझेटमध्ये मराठा समाजाची कुणबी मराठाअशी नोंद आहे.त्याचप्रमाणे कलार-कलाल समाज संपूर्ण भारतात ताडीच्या (दारूच्या) व्यवसायासाठी सर्वत्र प्रचलित आहे. सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेटमध्ये हैदराबाद संस्थानातील १८८२ च्या जनगणनेत कुणबी मराठा नोंद आहे म्हणजेच कलार -कलाल समाजाची पारंपरिक व्यवसायाची नोंद नक्कीच असायला हवी.शेती करणारे म्हणजे कुणबी मराठा, असा गॅझेटमध्ये उल्लेख आहे.म्हणजेच( दारूचा)ताडीचा व्यवसाय करणारे कलार-कलाल असा उल्लेख असायलाच पाहिजे.सरकार जर १८८२ म्हणजे निजामकालीन दस्तऐवज म्हणजे सातारा गॅझेट किंवा हैदराबाद संस्थानाच्या काळातील सरकारी राजपत्र गृहीत धरून आरक्षण देत असेल तर, सरकारने कलार-कलाल समाजाचा पारंपरिक (मद्य) व्यवसाय समाजाला द्यायलाच पाहिजे.यात यत्किंचितही पुराव्यांची गरज नाही.कारण मराठा समाजाला आरक्षण देवतांना स्वतंत्रपुर्व काळापासूनचा विचार केला आहे.त्याच आधारे कलार-कलार समाज सरकारला मागणी करते की, कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय स्वतंत्रपुर्व काळापासूनचा आहे आणि १९४६ पर्यंत संपूर्ण भारतात मद्य व्यवसाय हा कलार-कलाल समाजाचा पारंपरिक व्यवसाय होता.परंतु १९४७ नंतर मद्य व्यवसायावर राजकीय पुढाऱ्यांनी आपली पकड मजबूत केली व १९४७ पासून तर आतापर्यंतच्या देशातील संपूर्ण सरकारांनी व राजकीय पुढाऱ्यांनी कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय हिसकावला.त्यामुळे कलार-कलाल समाजामध्ये बेरोजगारीचे व गरीबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले.करीता राज्यातील संपूर्ण समाज महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या माध्यमातून सरकार सा-वधान करते की मराठ्यांच्या आरक्षणासाठी ज्याप्रमाणे निजामकालीन गॅझेटचा विचार केला त्यांच्या आधारे सरकारने संपूर्ण कलार-कलाल समाजाला मद्य व्यवसायाचे परवाणे ताबडतोब देण्याचा विचार करावा अन्यथा आम्हालाही रस्त्यावर उतरावे लागेल. निजामकालीन व इतर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मराठा -कुणबी, कुणबी -मराठा जात प्रमाणपत्रांसंदर्भात कार्यपद्धती निश्चित करणाऱ्या निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा पहिला अहवाल दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ ला राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला.या अहवालानुसार मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील सुमारे पावणेदोन कोटी नोंदी तपासण्यात आल्या असून १३ हजार ४९८ जुन्या कुणबी नोंद आढळल्या आ-हेत. म्हणजेच सरकारने निजामकालीन पुराव्यांच्या आधारावर जात प्रमाणपत्र देऊन आरक्षण देत आहे.याचे महाराष्ट्र कलाल- कलार समाज संघटना स्वागत करते.याच अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने कलाल-कलार समाजाच्या पारंपरिक मद्य व्यवसायाचा गांभिर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे.अन्यथा कलार-कलाल समाज आक्रमक पवित्रा घेईल.निजाम महाराष्ट्रात १७२४ पर्यंत होते म्हणजे आज त्या गोष्टीला जवळपास ३०१ वर्षे पुर्ण झालीत.परंतु कलार-कलाल समाजाचा पारंपरिक व्यवसाय हा पीढोनपिढ्या म्हणजे राजे-महाराज्यांपासुन सुरू होता. परंतु स्वतंत्र मिळाल्यानंतर गेल्या ७८ वर्षात या व्यवसायाचे संपूर्ण भारतात राजकारण झाले. कलाल -कलार समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आणि गरीब आहे.त्यामुळे समाजबांधवांना अनेक कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत असल्यामुळे समाजाच्या उत्थानासाठी पारंपरिक (मद्य) हक्काचा व्यवसाय मिळणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे सात-ारा गॅझेट, हैदराबाद गॅझेट व विश्वकर्मा योजनेअंतर्गत कलाल-कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मद्य (दारूचा व्यवसाय) सरकारने नियमानुसार परत करावा. सरकारमार्फत मद्य व्यवसायाची पहल सुध्दा सुरू आहे. राज्यात दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याचा सरकारचा विचार आहे.परंतु यात पहिला अधिकार कलाल-कलार समाजाला द्यायला हवा. राज्यात दारू विक्रीच्या दुकानांचे नवीन परवाने देणे १९७३ पासून बंद असतांना आता दारू उत्पादक कंपन्यांना नवीन विक्री परवाने देण्याचे उत्पादन शुल्क विभागाने प्रस्तावित केले आहे.उत्पादन शुल्क वाढीसाठी हा प्रस्ताव उपमुख्यमंत्री व वित्तीय मंत्री अजित पवार यांच्याकडे दिला आहे.ही बातमी दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोज सोमवारला अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली होती.याचे कलार समाजाने स्वागतच केले.आता दारू उत्पादक कंपन्यांना प्रत्येक जिल्ह्यात किरकोळ दारू विक्रीचे एक दुकान उघडण्यास मुभा देण्याचे प्रस्तावित आहे.असे अनेक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून प्रसिद्ध झाले होते .दारूच्या दुकानांचे परवाने वाढविताना व वाटप करतांना सरकारने विश्वकर्मा योजनेअंतर्गत व पारंपरिक व्यवसाया अंतर्गत फक्त कलाल-कलार समाजाचा विचार करावा.कारण दारूच्या दुकानांचा पहिला अधिकार कलाल-कलार समाजाचा आहे आणि त्यात माननीय पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी पारंपारिक व्यवसायाचा दुजोरा देवून विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपरिक व्यवसायवर प्रधानमंत्र्यांनी भर दिला आहे. त्याचं अनुषंगाने सरकारने नवीन परवाने देताना फक्त कलाल-कलार समाजाच्या पारंपारिक(मद्य) व्यवसायाचा गांभीर्याने विचार करावा. प्रधानमंत्री यांनी अमलात आणलेल्या विश्वकर्मा योजनेअंतर्गत व मराठा समाजाला देण्यात येणारे सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेट नुसार आरक्षण या संपूर्ण गोष्टींचा विचार करून पारंपारिक व्यवसायाचा विचार केला तर महाराष्ट्र सरकारला पारंपारिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातुन कलाल-कलार समाजाला बाजूला सारता येणार नाही ही बाब राज्य सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.कारण महाराष्ट्र सरकारचा उत्पादन शुल्क विभाग राज्यात दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याच्या तयारीत आहे.त्याचबरोबर बिअरबारचे परवाने पर-वाने वाढविण्याच्या तयारीत आहे.त्यामुळे प्रधानमंत्री यांनी घोषित केलेल्या विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपारिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातुन १०० टक्के कलाल- कलार समाज या चौकटीत बसतो.त्यामुळे यात कोणतीही ढवळाढवळ राजकीय पुढाऱ्यांनी करू नये.पुर्वी देशात करोडोंच्या संख्येने समाजबांधव ताडीचा व्यवसाय करायचे कालांतराने ताडीच्या व्यवसायाचे रूपांतर मद्य व्यवसायामध्ये झाले.कलाल-कलार समाज हा मुळातच आदिवासी आणि मागासलेला समाज आहे. कलार समाजाचा व्यवसाय मद्य बनवून विकने हा होता यावरच समाजबांधवांची उपजिविका होती. परंतु स्वतंत्र आंदोलनात दारूचा(मद्यचा) विपरीत परिणाम होवू नये.यासाठी महात्मा गांधींनी २४ में १९३४ रोजी कलाल-कलार समाजबांधवांना आग्रह केला की आपल्याला स्वातंत्र पाहिजे असेल तर स्वतंत्र मिळेपर्यंत आपल्या पारंपारिक व्यवसायाचा त्याग करावा लागेल.कारण याचा आंदोलकांवर विपरीत परिणाम होवू शकतो. त्यामुळे संपूर्ण भारता-तील करोडो समाज बांधवांनी महात्मा गांधींच्या आदेशाचे पालन करून आपल्या पारंपरिक व्यवसायावर बहिष्कार टाकला व स्वतंत्र लढ्यात उडी घेतली. कलाल-कलार समाजाची दारूबंदी फक्त स्वतंत्रपुर्व काळापर्यंतच होती.स्वतंत्र मिळाल्यानंतर कलार-कलाल समाजाने आपला व्यवसाय पुन्हा पुर्ववत सुरू केला.परंतू हा व्यवसाय अत्यंत लाभदायक आहे असे राजकीय पुढाऱ्यांच्या व पुंजीपतींच्या लक्षात आले आणि कलाल-कलार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाचे राजकारण झाले व तेव्हापासून लायन्स (परवाना) पध्द-ती अमलात आली. अशा परिस्थितीत कलाल-कलार समाजाला सरकारने फक्त १ टक्के दारूचे परवाने दिले व ९९ टक्के परवाने राजकीय पुढारी,त्यांचे नातेवाईक व पुंजीपती यांना परस्पर वाटुन दिले आणि कलाल-कलार समाजाचा विश्वास-घात झाला.परंतु आता सरकारने सा-तारा गॅझेट व हैदराबाद गॅझेट म्हणजे हैदराबाद संस्थानाच्या काळातील एक सरकारी राजपत्राचा आधार घेऊन सरकारने कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसायाचे परवाणे ताबडतोब द्यावेत अन्यथा महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना रस्त्यावर उतरल्या शिवाय रहाणार नाही.

**- रमेश लांजेवार (राज्य प्रवक्ता)**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना )**

# भाडेतत्त्वावर शेती करणार्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

**आत्ताच एक्सप्रेस**
**देगलूर /प्रतीनीधी /**
बिलोली तालूक्यात झालेल्या ढगपूटीदृश्य पावसामुळे मन्याड मांजरा लेंढी नदीमुळे हजारो एकर शेती पाण्याखाली गेली त्यामुळे भाडेतत्त्वावर शेती करणारा शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे त्यामुळे शास-नाने भाडेतत्त्वावर शेती करणार्या शेतकऱ्यांची चौकशी करून झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी यासाठी राष्ट्रीय पत्रकार संघ भारत संघटनेच्या वतीने बिलोलीचे तहसिलदार यांचेकडे निवेदन सादर करण्यात आले.

सविस्तर माहिती अशी कि बिलोली तालूक्यात मोठ्या प्रमाणात भाडेतत्त्वावर ( बटाऊ ) शेती केली जाते पाडव्याच्या मुहूर्तावर मुळ सातबारा मालकाकडुन विशिष्ट रक्कम देऊन एक वर्षासाठी शेती केली जाते शेती मशागती पासून तरपिक काढणी पर्यंत सर्व खर्च बटाऊ शेतकरी करीत आहेत दरव-र्षी निसर्गाच्या कोणकोणत्या कारणांमुळे शेतीचे मोठ्याप्रमाणात नूकसान होत आहे या नूकसान भरपाईचे शासनाकडुन मिळणारे अनुदान विमा हे मुळ सातबारा मालकाआ मिळत आहे त्यामुळे



सर्वसामान्य बटाऊ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई सहन करत आ-हेत यावर्षी ऑगस्ट महीन्यात झालेल्या ढगपूटीदृश्य पावसामुळे मन्याड मांजरा नदीच्या काठावर असलेल्या पाण्याच्या प्रवाहात हजारो एकर जमीनीचे नूकसान झाले आहे त्यामुळे भाडेतत्त्वावर शेती करणार्या शेतकऱ्यांना मोठ्याप्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे त्यामुळे शासनाने भाडेतत्त्वावर घेतलेल्या शेतकऱ्यांना मूळ शेतकऱ्यांप्रमाणे नूकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी राष्ट्रीय पत्रकार संघ भारत संघटनेच्या वतीने बिलोली देगलुर आमदार जितेश अंतापुरकर याना जिल्हा अध्यक्ष इर्शाद पटेल यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले यावेळी बिलोली तालूका उपाध्यक्ष विलास शेरे सचिव दयानंद भद्रे भास्कर भालेराव शिवलिंग गायकवाड उपस्थित होते.

## खा.सोनवणेंची कार्यतत्परता; बीडमध्ये उपोषणकर्त्यांशी संवाद साधत काढला मार्ग

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज/ प्रतिनिधी/**
बीड जिल्ह्यात कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी खा.बजरंग सोनवणे धावून येत असल्याचे वारंवार पहायला मिळत आहे.दि.१२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसलेल्या उपोषणकर्त्यांची खा.सोनवणे यांनी तत्परतेने भेट घेत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेतील गटसचिवांचा प्रश्न मार्गी ला-वून तातडीने उपोषण सोडविले. याच बरोबर बंजारा समाजाला सोबत असल्याचा शब्द दिला. दरम्यान, गायरान धारकांना तुमचा प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना बोलतो, असे म्हणत दिलासा दिला.

मागील काही दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी उपोषणे सुरू आहेत. दि.१२ सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत असलेल्या उपोषणकर्त्यांची भेट घेतली. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्था, म.बीड येथे ८६ कर्मचारी कार्यरत असून मागील ४ ते ५ वर्षांपासून त्यांचे वेतन करण्यात आलेले नाही. असे असले तरी ते कामकाज पुर्ण करत आ-हेत. असे असताना त्यांना वेतन दिले जात नाही. सदरील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात यावे, यासाठी दि.८ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे. खा.सोनवणे यांनी भेट दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधक यांनी उपोषणस्थळी येऊन पुढील २० दिवसात वेतनाचा प्रश्न मार्गी ला-वला जाईल, असे लेखी दिले. यानंतर खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते लिंबूपाणी देऊन उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्ते ए.एल.उनवणे व उपोषणकर्ते उपस्थित होते. यानंतर अखिल भारतीय बहूजन शेतकरी गायरान धारक न्याय हक्क संघर्ष मोर्चाच्या वतीने गायरान सातबारा मिळण्यासाठी करचुंडी येथील जयसिंग वीर यांच्या सुरू असलेल्या उपोषणास्थळी भेट देऊन वीर यांच्याशी संवाद साधला. वीर यांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत सविस्तर माहिती दिल्यानंतर मी




तातडीने जिल्हाधिकारी यांच्याशी बोलतो, आणि आपल्या मागण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सुचना देतो असे म्हणत उपोषणकर्त्यांना दिलासा दिला. यानंतर मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर नूसार अनुसुचित जमाती प्रवर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याबाबत सतिष पवार, रा. कोळगाव तांडा यांच्या उपोषणाला भेट दिला. यावेळी त्यांनी सतिष पवार यांची भेट घेत संवाद साधला. मी आपल्यासोबत आहे, अस-ेही खा.सोनवणे यांनी स्पष्ट केले. यावेळी बंजारा समाजातील तरूणांनी खा.सोनवणे यांचे टाळ्यांचा कडकडाट करत स्व-ागत केले.

# वीज कंपन्यांतील अतांत्रिक अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही शासकीय वीज कंपन्यांमधील रिक्त असलेली अतांत्रिक अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरावीत, अशी मागणी एमएसईबी ऑफिसर्स असोसिएशनने तिन्ही कंपन्यांच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांकडे केली आहे.

**एमएसईबी ऑफिसर्स असोसिएशन ची मागणी**

प्रदीर्घ काळापासून महावितरण कंपनीत वेतनगट १ व २ मधील विधी, सुरक्षा व अंमलबजावणी, माहिती तंत्रज्ञान, वित्त व लेखा, मानव संसाधन, औद्योगिक संबंध, जनसंपर्क या संवर्गातील सरळसेवा/अंतर्गत प्रक्रियेद्वारे भरण्यात येणारी पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत. ही पदे तातडीने भरण्याबाबत महावितरणचे संचालक (मासं) राजेंद्र पवार यांची असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी ११ सप्टेंबर २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. अतांत्रिक संवर्गाची पदे जवळपास मागील १० वर्षांपासून भरण्यात आलेली नाहीत, ही बाब असोसिएशनचे सरचिटणीस संजय खाडे यांनी संचालक (मासं) राजेंद्र पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. सदर प्रकरणी लवकरच योग्य ती कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन पवार यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

यासह सांघिक कार्यालय स्तरावरील अतांत्रिक संवर्गातील दीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेले पदोन्नती पॅनल लवकरात लवकर घेण्याची तसेच प्रतीक्षा यादीत असलेल्या अधिकाऱ्यांचे ३० सप्टेंबरपूर्वी पदोन्नती आदेश निर्गमित करण्याची विनंती पदाधिकाऱ्यांनी केली.



याशिवाय पुणे येथील वाढती वीजग्राहक संख्या लक्षात घेता माहिती तंत्रज्ञान विभागाकरिता नव्याने रास्ता पेठ, पुणे येथे सॉफ्टवेअर सेलची निर्मिती करण्याची विनंती करण्यात आली.

यासह अनेक प्रलंबित प्रश्नांचे निवेदन संघटनेच्या वतीने संचालक (मासं) यांना देण्यात आले. याच धर्तीवर महाप-ारेषण व महानिर्मिती कंपनीमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन प्रलंबित प्रश्न सोडवण्याबाबत निवेदन देण्यात आले. या प्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश लडकत, सरचिटणीस संजय खाडे, उपसरचिटणीस प्रणेश शिरसाट, केंद्रीय कोषाध्यक्ष प्रवीण गायकवाड व केंद्रीय सल्लागार गुलाबराव मानेकर उपस्थित होते.

## बहुलखेडा अजगर हत्या प्रकरणी आरोपींना अटक करा;-वन्यजीव रक्षक

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी** / बहुलखेडा शिवारात शेळी गिळंकृत केलेल्या अजगराचा ठेचून हत्या केल्या प्रकरणी सोयगाव वनविभागाकडून अद्यापही आरोपी अटक करण्यात आलेले नाही या मागणीसाठी शुक्रवारी वन्यजीव रक्षक संघटनेचे वतीने सोयगाव तहसील वर तासभर निदर्शने करून तातडीने आरोपी अटक करून संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी अनिल मिसाळ यांच्यावर निलंबनाची कारवाई करा अशी मागणी लेखी निवेदनात केली आहे.

बहुलखेडा शिवारात शेळी गिळंकृत केलेल्या अजगराचा ठेचून हत्या करून त्याच्या पोटातून मृत शेळी बाहेर काढल्या चा प्रकार अज्ञातांनी केला होता त्या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता या घटनेला दहा दिवस उलटूनही अद्यापही सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओ मधील सात ते आठ आरोपीना वनविभागाने अटक केलेली नाही या मागणीसाठी शुक्रवारी वन्यजीव रक्षक रेस्कु सेंटर चे सचिव दिनेश गायकवाड, अध्यक्ष अतिष चांगरे यांच्या नेतृत्वाखाली सोयगाव तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले निवेदनवर संदीप इंगळे,ज्ञानेश्वर गाडेकर,अशोक ढगे,प्रथमेश बोडखे, रितेश गायकवाड, दिलीप शिंदे,मयूर रामेश्वर, वैभव बडगुजर, रवींद्र राठोड, संदीप चव्हाण आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदावर दिलिप बनकर यांची निवड



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी**/राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदावर गंगापूर तालुक्यातील आंबेलोहळ येथील रहिवासी दिलीप बनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष तथर सुनील तटकरे, यांनी १० सप्टेंबर रोजी दिलेल्या पत्र- द्वारे ही नियुक्ती जाहीर केली. पक्षाच्या वाढीसाठी व ध्येय-घोषणेचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी बनकर यांचे मोलाचे सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदावर निवड झाल्याबद्दल बनकर यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार, जिल्हाध्यक्ष तथा आमदार सतीश चव्हाण, गंगापूर तालुका अध्यक्ष संजय जाधव, सोपान देशमुख, मुकुंद जोशी, अविनाश सोनवणे, संतोष अंबिलवादे, रामेश्वर नावंदर, तुकाराम सटाले, इनुस शेख, वसीम कुरेशी, गणेश देसाई, नानासाहेब इंगळे यांनी अभिनंदन केले.

## घाणेवाडी तलाव परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यात व शहरात दि.२२ सप्टेंबर २०२५ रोजी नवरात्रौत्सव (घटस्थापना) व दि.२ ऑक्टोबर २०२५ रोजी दसरा सण साजरा होणार आहे. तसेच दि.१ व २ ऑक्टोबर रोजी देवी मुर्तीचे विसर्जन करीता मोतिबाग येथे तलाव व्यवस्था करण्यात आली आहे. घाणेवाडी तलावातून पिण्याचे पाणी जालना शहरात येते. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अंतर्गत घाणेवाडी तलावाच्या २०० मिटर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. सदरील आदेश दि.२ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्रीचे २४ वाजेपर्यंत वाजेपर्यंत लागू राहील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहे.

## विभागीय रेल्वे सल्लागार समितीची बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस/ जालना (प्रतिनिधी)** प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ रोजी विभागीय रेल्वे सल्लागार समितीची बैठक नांदेड विभागीय कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीस नांदेड विभागातून विविध ठिकाणाहून १३ सदस्य उपस्थित झाले होते.डॉ. विजय कृष्णा, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, नांदेड यांनी नांदेड विभागाने गेल्या वर्षभरात केलेल्या विविध कार्याची माहिती दिली, रेल्वे प्रवाश्यांकारिता करत असलेल्या विविध कार्याचे सल्लागार समितीने कौतुक केले. नांदेड विभागात होत असलेल्या विविध विकास कामांची माहिती डॉ. विजय कृष्णा यांनी उपस्थितांना दिली.सल्लागार समिती सदस्यांनी विविध स्थानकावर असलेल्या समस्यांचे समाधान करण्या करिता मागणी केली. नांदेड येथून मुंबई करिता नवीन रेल्वे सुरु करणे, नागपूर-मुंबई रेल्वे पुन्हा सुरु करणे, औरंगाबाद-मुंबई नवीन रेल्वे सुरु करणे, उत्तर भारतात जाण्या करिता नवीन रेल्वे सुरु करणे , विविध एक्स्प्रेस मध्ये डब्बे वाढविणे आदी मागण्या मांडल्या. कामले यांनी कळविले कि नांदेड विभागातून नवीन गाडी सुरु करण्यासाठी नांदेड विभाग दर वर्षी मुख्यालय कडे प्रस्ताव पाठवत आहे. पुढील निर्णय मुख्यालय तसेच रेल्वे बोर्ड घेतील.प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी सर्व सदस्यांना कळविले कि नांदेड विभागाने गत वर्ष भरात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नवीन नांदेड - फिरोझपूर एक्स्प्रेस, वंदे भारत एक्स्प्रेस चा विस्तार,औरंगाबाद आणि जालना रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण, अमृत भारत योजने अंतर्गत १५ रेल्वे स्थानकांचा विकास, नांदेड आणि औरंगाबाद स्थानकांवर प्रीपेड वातानुकुलीत प्रतीक्षालय तसेच बेटरी चालीत लगेज गाडीची सुविधा, प्रवाशांच्या सुविधे करिता विविध ठिकाणी विशेष गाड्या चालविणे, गाड्यांना अतिरिक्त डब्बे जोडणे, आदी महत्वाची कार्य केल्याचे श्री कामले यांनी सांगितले.या बैठकीत उपस्थित विभागीय रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती सदस्यांतून श्री राम चव्हाण यांची क्षेत्रीय रेल्वे उपभोक्ता समितीवर सदस्य पदी (ZRUCC MEMBER) निवड करण्यात आली.या निवडी बद्दल डॉ. विजय कृष्णा, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, रितेश, वाणिज्य व्यवस्थापक तसेच इतर विभागीय रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती सदस्यांनी चव्हाण यांचे अभिनंदन केले.

# हजरत सय्यद जैनोद्दीन मौलाना दाऊद हुसैन शिराजी यांच्या ६७६ व्या उरूसाची तयारी पूर्ण




**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद / प्रतिनिधी**/ खुलताबाद शहरातील प्रसिद्ध सूफी संत खतम उल मशाएक हजरत ख्वाजा सय्यद जैनोद्दीन मौलाना दाऊद हुसैन शिराजी उर्फ बाईस ख्वाजा रह. यांचा ६७६ वा वार्षिक उरूस पारंपरिक पद्धतीने १४ ते १८ सप्टेंबर २०२५ दरम्यान साजरा होणार आहे. दर्गा हद्दे खुर्द कमिटीच्या देखरेखीखाली उरूसाची तयारी पूर्ण झाली असून दर्गा परिसरात रंगरोगण, स्वच्छता, प्रकाश व पाणी व्यवस्थेची कामे करण्यात आली आहेत.१४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता चुना ची फातेहा होऊन उरूसाचा शुभारंभ होईल. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता फराशे कार्यक्रम, तर १६ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० वाजता संदल व मांडवाचा कार्यक्रम पार पडेल. १७ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता ऑल इंडिया मुशायरा आयोजित करण्यात आला असून यात विविध नामांकित कवी सहभागी होणार आहेत. त्याच रात्री १ वाजता चिरंगा या धार्मिक कार्यक्रम होईल.

१८ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता वाजता दर्गा बाबा बुरहानोद्दीन गरीब रह. येथून संदल मिरवणुकीस सुरुवात होईल. ही मिरवणूक शहरातून भ्रमण करून रात्री ९ वाजता दर्गा सय्यद जैनोद्दीन शिराजी येथे पोहोचेल. त्यानंतर रात्री ९.३० वाजता बद्दी फतेहा,कव्वाली मेहफिल-ए-समां व रात्री २.३० वाजता खाजगाने चिश्तची विशेष फातेहा होईल. भाविकांसाठी प्रकाश, पाणी, प्रसाद आदींची सोय करण्यात आली असून, दर्गा कमिटीचे अध्यक्ष शरफोद्दीन मोहम्मद रमजानी, उपाध्यक्ष अलिमुद्दीन मुजावर, सचिव मसियोद्दीन फकरूद्दीन तसेच खुद्दामीन दर्गा व सदस्यांनी भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## चिंतामणि रेसीडेंसी बीड बायपास येथे पर्युषण पर्वाची उसाहात सागता



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती सभाजीनगर / प्रतिनिधी**/ श्री १००८ पुष्पदंत दिगबर जैन मदिर बीड बाय पास येथे भगवान पुष्पदंत जैन मदिरात पर्युषण दहा दिवस दररोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते दररोज भगवताचा अभिषेक शातीधारा पुजा आरती करून दहाधर्मावर विशेष पुजा व उदबोधन केले यावेळेस दहा उपवास कर्ता सूचित मानिकचंद बाकलीवाल,नवीन जितेंद्र पहाडे ,रीना सचिन बडजाते ,संजय रामलाल पाटनी ,नेहा संजय पाटनी ,रजत रूपेश चुड़ीवाल ,उदय प्रकाशजी पाटोदी ,अलकेश अशोक लोहाड़े याचा यावेळेस अभिनंदन करण्यात आले तसेच १०दिवस सोधर्म इंद्र इंद्राणी विद्या पवनजी रावका यानी दररोज भगवताचा अभीषेक व शातीधारा केली दररोज संध्याकाळी आरती व सांस्कतिक कार्यक्रमाने सागता झाली.

## नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान : लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत.

या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत.

जिल्हा व तालुका स्तरावर शिबिरे

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील.

उपक्रमातील संस्थांचा व्यापक सहभाग

या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्र रुग्णालये व विविध सामाजिक संस्था या उपक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी होणार आहे.

तळागाळातील नागरिकांसाठी मोठा दिलासा

नेत्ररोग उपचाराचा खर्च गरीब नागरिकांच्या खिशाला परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळण्याचा मार्ग या उपक्रमातून खुला होणार आहे.या उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशातूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहचण्याकरिता सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहे. यामुळे लाखो रूग्णांवर मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रियेसह औषधोपचार केले जाणार आहेत. या शिबिराचा लाभ राज्यातील गरजू रूग्णांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

**जा.क्र./मनपा/ई- निविदा / २०२५/२४६**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
**दिनांक :- १२.०९.२०२५**

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | मनपाच्या वेदांतनगर उद्यानात विविध उद्यान विषयक कामे करणे. | १६.०९.२०२५ |
| २. | झोन क्र. ०९ कार्यक्षेत्रात विविध वॉर्डातील अंतर्गत व.मुख्य रस्त्यांचे डांबरीकरणव्दारे पंचवर्क करणे. | १६.०९.२०२५ |
| ३. | One World - Our World, सर्वे क्र. ४०, सि. स. न. १६३१५, ते प्रतापनगर स्मशानभूमीकडे जाणाऱ्या १५.०० मीटर रस्त्यांवर जलनि:सारण वाहीणी टाकणे. | १६.०९.२०२५ |
| ४. | One World Our World, सर्वे क्र. ४०, सि. स. न. १६३१५, ते प्रतापनगर स्मशानभूमीकडे जाणाऱ्या १५.०० मीटर रस्त्यांवर व पुर्व कडील १२ मीटर रस्त्यावर स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे. | १६.०९.२०२५ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**सिस्टीम मॅनेजर (ई- निविदा)**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**




कन्नड ग्रामीण प्रतिनिधी.सुनिल निकम कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील जिल्हा मध्यवर्ती बँक नादरपुर येथे क्लार्क म्हणून के व्ही थोरात साहेब यांची निवड झाल्याबद्दल नादरपुर ग्रामस्थ यांच्याकडून सत्कार करण्यात आला या वेळी कॅशियर आर यच शेजवळ शिपाई यस जी निंभोरकर ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.छायाचित्र सुनिल निकम

## अविष्कार २०२५ मध्ये देवगिरी महाविद्यालयाचे विद्यार्थी अव्वल

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर आणि म .शि .प्र मंडळ संचालित श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हा- स्तरीय अविष्कार २०२५ स्पर्धेत देवगिरी महाविद्यालयाला भरघोस यश मिळाले आहे. जिल्हास्तरीय अविष्कार २०२५ या स्पर्धेसाठी देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथील ३० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांनी आपल्या नवनवीन कल्पना, वैज्ञानिक संशोधन, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणाऱ्या संशोधनात्मक साहित्य तयार करून या स्पर्धेत भाग घेतला होता. जिल्हास्तरीय असणाऱ्या या स्पर्धेत देवगिरी महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या अविष्कार २०२५ साठी निवड झाली आहे.या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपला संशोधनात्मक विषय घेऊन त्याचे उत्तम सादरीकरण केले. विजयी स्पर्धकांचे म .शि .प्र मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे जेष्ठ सदस्य मा. पंडितराव हर्षे, प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते आदी मान्यवरांनी कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## दौलावडगाव येथे मोहंमद पैगंबर जयंती उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी/ जावेद सय्यद**/ माणुसकी, शांती आणि भाईचारा या पैगंबरांच्या संदेशाने दुमदुमलेले वातावरण, हातात झेंडे, गगनभेदी घोषणाबाजी आणि उत्साहाने ओसंडून वाहणारी गर्दी अशा जल्लोषात दौलावडगाव येथे मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्ताने भव्य जुलूस काढण्यात आला. या जुलूसात सर्वधर्मीय नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला आणि दौलावडगावकरांनी पुन्हा एकदा ऐक्याची परंपरा जगासमोर ठेवली.जगाला मानवतेचा संदेश देणारे व क्षमा संयम परम आदर सहनशीलतेचा मार्ग दाखवणारे इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जाणारा ईद-ए-मिलाद मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कुरेशी मशीद ते जामा मशिद या मार्गाने होत धार्मिक गीते हातात झेंडे व मोहम्मद पैगंबर यांच्या कार्याबद्दल माहिती देत नसरुद्दीन बाबा पीर बाबा येथे हा जुलूस पोहोचला. मार्गात ठिकठिकाणी नागरिकांनी जुलूसाचे स्वागत केले.

मुस्लिम बांधवांनी आपल्या वरिष्ठ सदस्य व चिमुकल्यासह आनंदोस्तव साजरा केला तसेच सकल मराठा संघाच्या वतीने मसाला दुधाची व्यवस्था करण्यात आली होती मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला पैगंबर जयंतीच्या निमित्ताने दौलावडगाव येथे सर्वधर्मीय नागरिकांच्या उपस्थितीत निघालेला हा जुलूस केवळ धार्मिक सोहळा न ठरता शांती, बंधुता आणि एकतेचा सजीव संदेश ठरला.त्यानंतर जेवणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यासाठी हिंदू मुस्लिम समाजातील नागरिकांनी मोठी गर्दी करून जेवणाचा आनंद घेतला .

# संपादक सतिश बियाणी यांचे दुःखद निधन



**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी / प्रतिनिधी**/ येथील दै. मराठवाडा साथीचे संपादक सतिशमोहनलाल बियाणी यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. कै. सतिश बियाणी यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.दैनिक मराठवाडा साथीचे संपादक म्हणून सतिश बियाणी यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. परळी शहरातील अनेक पत्रकार घडवण्याचे काम त्यांच्या माध्यमातून झाले. स्व. मोहनलालजी बियाणी यांनी सुरू केलेल्या दैनिक मराठवाडा साथीच्या भरभराटीमध्ये सतीश बियाणी यांचा मोलाचा वाटा होता.

वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी मराठवाडा साथीचे वटवृक्षात रूपांतर केले. धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यामध्ये ते सहभागी होत असत. मराठवाडा साथीच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचारही सुरू होते. उपचार सुरू असतानाच संभाजीनगर येथील एका खाजगी दवाखान्यांमध्ये त्यांनी आज दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजण्याचे सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

कै. सतीश बियाणी यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, पत्नी, मुलगी, मुलगा, भावजई, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे.

**आज संभाजीनगर येथे अंत्यसंस्कार**

कै. सतिश बियाणी यांच्या पार्थिवावर उद्या शनिवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सिडको बसस्टॅण्डच्या पाठीमागे, हॉटेल ग्रँड कैलासच्या बाजूला, प्रविण मॅजिकच्या बाजूची गल्ली, श्री अंजनी कुरिअर्सच्या समोर सिडको, छत्रपती संभाजीनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## संक्षिप्त

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांच्या शुभ हस्ते बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता हुतात्मा स्मारक, जालना येथे होणार आहे.तत्पुर्वी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. तरी सर्व शासकीय, निमशासकीय, सहकारी संस्था आदि कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोशाखासह ध्वजारोहणास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



### २६ सप्टेंबरला हयात प्रमाणपत्रासाठी तहसील कार्यालयात शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत विशेष सहाय योजनेतील लाभार्थ्यांच्या हयात दाखल्याबाबत बेनिफिशरी सत्यापन प विकसीत केले आहे. जालना तहसिल कार्यालयात शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत शिबीर आयोजित करण्यात आले आहे. तरी तहसिल कार्यालय जालना येथे सुचना फलकावर डकविण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी शिबीरात उपस्थित राहून हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन जनरेट करुन घ्यावे, असे आवाहन तहसीलदार छाया पवार यांनी केले आहे.

बेनिफिशरी सत्यापन पव्दारे केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्यांचे डिजीटल लाईफ सर्टीफिकेट म्हणजे हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करावयाचे असून सादर केलेले प्रमाणपत्र एनएसएपी पोर्टलवर अपडेट होत आहेत. तरी जालना जिल्ह्यातील इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ, दिव्यांग, विधवा, परित्यक्त्या योजनेअंतर्गत लाभ घेणारे लाभार्थी यांनी संजय गांधी शहर व ग्रामीण तहसील कार्यालय जालना, महाईसेवा केंद्र, सीएससी केंद्र, ग्रामपंचायत केंद्र, येथे डिजीटल हयात प्रमाणपत्र म्हणजे हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करावेत.विशेष सहाय कार्यक्रमांतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतनयोजनेअंतर्गत डीबीटीव्दारे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत असून ज्या लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत बँक खात्याशी आपले दूरध्वनी क्रमांक संलग्न केलेले नसल्यास संबंधित बँक, पोस्ट कार्यालय येथे आपला दूरध्वनी क्रमांक लिंक करुन घेण्यात यावा. जेणेकरुन एसएमएसव्दारे अनुदान जमा झाल्याची माहिती होईल. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानातंर्गत अंबड येथे तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरीता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासुन तालुका, जिल्हा, महसुल विभाग व राज्य अशा स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरीता मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अभियानाचा कालावधी हा दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर संबधित अधिकारी, पदाधिकारी यांच्या करीता प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करुन अभियानाची उद्दीष्टे, भुमिका व जबाबदाऱ्याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी शुक्रवार दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १२ वाजता मत्सोदरी देवी संस्थान सभागृह अंबड येथे तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. असे गटविकास अधिकारी अंबड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# वाळू चोरीवर जगणाऱ्या माफियानें कस्तुरवाडी परिसरात मुडके काढले वर

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर / प्रतिनिधी/** लाहुकी नदी परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसाविरोधात तक्रार करणाऱ्या युनुस बेग युसूफ बेग (रा. कस्तुरवाडी, ता. बदनापूर) या नागरिकाला वाळू माफियाकडून उघडपणे धमकावण्यात आले असून एवढेच नव्हे, तर नायब तहसीलदारांच्या अधिकृत गाडीतून जबरदस्तीने खेचून त्यांची बेदम मारहाण करण्यात आली. ही धक्कादायक घटना गुरुवारी (११ सप्टेंबर) दुपारी साडेबारा वाजता घडली.सविस्तर माहिती अशी की, दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी तक्रारदार युनुस बेग युसूफ बेग यांनी जिल्हाधिकारी कार्यालय जालना, उपविभागीय अधिकारी कार्यालय जालना, तहसील कार्यालय बदनापूर, पंचायत समिती कार्यालय बदनापूर, जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय जालना व बदनापूर पोलिस स्टेशन येथे कस्तुरवाडी शिवारातील लाहुकी नदीतून वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध लेखी तक्रार केली होती.

**सामाजिक कार्यकर्त्याला नायब तहसीलदार यांच्या गाडीतून खेचून केली मारहाण**

या तक्रारीनंतर नायब तहसीलदार तायडे हे पाहणीसाठी आले व तक्रारदार सुद्धा त्यांच्या गाडीत बसून त्यांना वाळू उपसा होत असलेल्या ठिकाणी घेऊन जात होते. त्या ठिकाणी ते एका ट्रॅक्टरच्या मागे जात असताना इनायत युनुस बेग, नाझीम नयुम बेग, जुनेद जफर बेग व जावेद जफर बेग (सर्व राहणार कस्तुरवाडी) हे वाळू चोरी करून जगणारे वाळू माफिया अचानक त्या ठिकाणी आले व तक्रारदारास चक्क नायब तहसीलदार यांच्या गाडीतून खेचून बाहेर काढले आणि त्याची बेदम मारहाण व शिवीगाळ केली, अशी माहिती तक्रारदार युनुस बेग युसूफ बेग यांनी बदनापूर पोलिस स्टेशनमध्ये दिली आहे.

तक्रारदार युनुस बेग युसूफ बेग यांनी एक दिवस अगोदरच जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देऊन वाळू माफियांवर कारवाई न झाल्यास स्वतःचा जीव धोक्यात येईल असा इशारा दिला होता. परंतु प्रशासन व पोलिसांकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. उलट तक्रारदारावरच हल्ला झाला आणि या प्रकरणी पोलिसांनी फक्त नॉन-कॉग्निजेबल रिपोर्ट (छ्उठ) नोंदवून हलकी कलमे लावली. त्यामुळे आरोपींना अटक करण्याचा अधिकार पोलिसांकडे नाही. परिणामी आरोपी अजूनही मोकाट फिरत असून तक्रारदार व त्याच्या कुटुंबात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गंभीर हल्ल्यानंतरही पोलिसांनी हलकी कलमे लावल्याने पोलिस व प्रशासन या दोन्ही यंत्रणा वाळू माफियांना पाठीशी घालत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. ही घटना नायब तहसीलदारांच्या गाडीत घडल्याने त्यांनी स्वतः तक्रार करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गंभीर गुन्हा दाखल करायला हवा होता, परंतु त्यांनी या बाबत पोलिसांना कोणतीही सूचना दिली नाही. त्यामुळे त्यांची भूमिकाही संशयास्पद ठरत आहे.

बीट अंमलदार जोनवाल यांच्या आशिर्वादाने या परिसरात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पोलिसांना या धंद्याची माहिती दिली तर तक्रार करणाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे. हे माफिया खुलेआम म्हणतात, तुम्हाला जे करायचे ते करा, आमचे हफ्ते प्रशासनाला जातात. देवगाव फाट्यावर अवैध दारू, चक्री खेळ, जुगार यांसारखे अनेक अवैध धंदे जोमात सुरू असून कारवाई मात्र अद्याप झालेली नाही. त्यामुळे पोलिसांना हफ्ते मिळत आहेत का, असा प्रश्न निर्माण होत आहे.

बीट अंमलदार जोनवाल हे फोर व्हीलर गाडीतून फिरतात, गोरगरिबांना धमकावून स्वतःला सिंघम समजतात. मग या अवैध धंदे चालवणाऱ्यांवर ते कारवाई करण्याची हिंमत का करत नाहीत? त्यांना या धंदे करणाऱ्यांची भीती वाटते का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.अवैध धंदे करून वाळू चोरीवर जगणाऱ्या या भामट्यांची एवढी हिंमत कशी वाढली की त्यांनी चक्क एका राजपत्रित अधिकाऱ्याच्या गाडीतून तक्रार करणाऱ्याला खेचून मारहाण केली आणि राजपत्रित अधिकारी फक्त तमाशा पाहत राहिले. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

आज हे माफिया सामान्य नागरिकांना मारत आहेत, उद्या अधिकारी व पत्रकारांवर हल्ले करतील, तेव्हा प्रशासनाचे डोळे उघडणार काय? आता तरी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी बदनापूर तालुक्यातील या भामट्या अवैध धंदे करणाऱ्यांवर तात्काळ व कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे.

## आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी नागरिकांना कालमर्यादेत सेवा द्यावी - उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली सद्यस्थितीत जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी विहीत कालमर्यादेत नागरिकांना सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व आपले सरकार केंद्र चालकांच्या आयोजित दुरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी दिले.




दुरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीस नायब तहसीलदार राजू निहाळ, जिल्हा प्रकल्प प्रमुख प्रल्हाद तारख, अभियंता सुर्यकांत मगर, जिल्हा समन्वयक मंगेश जाधव यांची प्रत्यक्ष उपस्थिती होती.उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल म्हणाले की, सर्व केंद्रचालकांनी आपले सरकार सेवा केंद्र हे शासनाने नेमुन दिलेल्या जागेवर चालवावेत. केंद्र इतरत्र चालवत असल्याचे निर्देशनास आल्यास संबंधित केंद्र चालकावर कारवाई करण्यात येईल. नागरिकांचे अर्ज ऑनलाईन करतांना सर्व केंद्रचालकांनी नागरिकांचाच मोबाईल नंबर टाकणे अनिवार्य आहे. अर्जदार यांना त्यांचे अर्जाच्या स्थितीची माहिती एसएमएस व व्हॉटसअपद्वारे त्वरित उपलब्ध करून द्यावी. तसेच त्यांचे प्रमाणपत्र अर्जदार यांना त्यांचे व्हॉटसपवर उपलब्ध करून द्यावे. कोणीही प्रिंट काढून देणार नाही याबाबत खबरदारी घ्यावी. सर्व केंद्रचालकांनी केंद्रावर शासनाने दिलेल्या स्टँडर्ड नमुन्यातच केंद्राच्या दर्शनी भागातील बॅनर व दरपत्रक लावावे. जे केंद्रचालक आपले केंद्रावर शासनाचे दरपत्रक व सेवाविषयक बाबींचा तपशिल लावणार नाही. त्यांचे केंद्र बंद करण्यात येईल. सर्व सेवांची यादी, शुल्क व अपेक्षित कालावधी स्पष्टपणे फलकावर लावावा. कुणीही एजंटकडून व्हाटसअपवर डॉक्युमेंट मागवून फाईल ऑनलाईन करू नयेत. खोटी डॉक्युमेंट अपलोड करू नये. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधित केंद्र चालकाचे केंद्र तात्काळ रद्द करण्यात येवून, फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी सर्व व्यवहार कॅशलेश, ऑनलाईन पेमेंटचे प्राधान्याने करावेत. जेणेकरून पारदर्शकता आणता येईल. सर्व सेवांसाठी ठराविक शुल्कापेक्षा अधिक आकारणी होऊ नये. अशी बाब निर्देशनास आल्यावर संबंधित केंद्र चालकावर कारवाई करण्यात येईल. दोन प्रकारचे क्युआर कोड असून, एक विविध प्रमाणपत्राकरीता व एक नागरिकांच्या ऑनलाईन तक्रार नोंदविण्यासाठी आहे. सदर दोन्ही क्युआर कोडची प्रिंट सर्वांनी केंद्राच्या दर्शनीय भागावर लावावी. जेणेकरून नागरिकांस ऑनलाईन तक्रार करता येईल. सर्व केंद्रचालकांनी प्रतिक्रिया नोंदवही ठेवावी. तसेच त्यांनी दिलेल्या सेवाबाबतचा तपशिल नोंदवहीत ठेवणे अनिवार्य आहे. जेणेकरून शासनाचे तपासणीवेळी सदर नोंदवहीनुसार आपण दिलेल्या सेवांबाबत पडताळणी करणे सुलभ होईल. जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये मुलभूत सुविधा स्थापित कराव्यात. प्रत्येक केंद्रात सीसीटिव्ही कॅमेरे बसवून पारदर्शकता वाढविण्याबाबत निर्देशही देण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील सर्व आपले सेवा केंद्रचालक ऑनलाईन उपस्थित होते.

## १६ सप्टेंबर रोजी जालना येथे प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने तसेच रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. तरी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र जालना येथे मंगळवार दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह -जागेवर निवड संधीचे आयोजन सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

पेटीएम सव्हिसेस प्रा.लि. जालनाचे सेल्स प्रतिनिधी पदासाठी बारावी, पदवी उत्तीर्णसाठी २५ पदे, त्याच प्रमाणे भारत फायनन्स प्रा.लि. जालना यांचे फिल्ड प्रतिनिधी, शाखा व्यवस्थापक आणि सहाय्यक शाखा व्यवस्थापक पदासाठी दहावी, बारावी पास, उत्तीर्णसाठी ६६ पदे अशी एकूण ९१ रिक्त पदे प्राप्त झालेली आहेत. नोकरी इच्छुक पात्रता धारक उपस्थित होणाऱ्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या एन.सी.एस. पोर्टलवर रजिस्ट्रेशन करण्यासाठी देखील www.ncs.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेजवरील जॉब सिकर लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्या आधारे लॉगिन करावे.

त्यानंतर डॅसबोर्डमधील पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्राईव्ह ०४ याची निवड करावी. किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आदि कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायाप्रती संच सोबत ठेवून मंगळवार दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ ते दु. २ या वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकतामार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जालना ४३१२०३ येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे आणि रोजगाराच्या या पर्वणीचा निश्चित लाभ घ्यावा. असे सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपकाद्वारे कळविले आहे.

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा,पावसाची शक्यता

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. १४ ते १६ सप्टेंबर २०२५ रोजी यलो अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) येण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी हलका ते स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांच्यापासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफार्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणाऱ्या / लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल तर सदर मालाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरिकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियाना अंतर्गत बदनापुर येथे कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामंपचायतीस कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषदासाठी सन २०२५-२६ या आर्थीक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसुल विभाग व राज्य अशा स्तरावर प्रोत्साहन देण्याकरिता मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यास ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.याअभियानाचा कालावधी दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ असा आहे. मुख्यमंत्रो समृध्द पंचायतराज अभियान हे ७ मुख्य घटकांवर आधारित आहे.

सुशासनयुक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन) तयार करणे, सक्षम पंचायत, जलसमृध्द, स्वच्छ व हरित गांव निर्माण करणे, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे, गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे, उपजिविका विकास, सामाजिक न्याय,लोक सहभाग व श्रमदान माध्यमातुन लोक चळवळ निर्माण करणे.वरील घटकांवर झालेल्या कामगिरीच्या आधारे गुणांकन नुसार ग्रामपंचायतीची प्रथम, व्दितीय व तृतीय याप्रमाणे पुरस्कारसाठी निवड केली जाईल. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची ग्रामपंचायत स्तरावरील पदाधिकारी, संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामस्थ व ग्रामीण स्तरावरील कर्मचारी यांचे उदिष्टे, भूमिका व जबाबदाऱ्या या विषयो मार्गदर्शन करण्यासाठी तालुकास्तरिय कार्यशाळा आज दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता साक्षी लॉन, बदनापुर येथे अंबड-बदनापुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायणराव कुचे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली होती.

या कार्यक्रमाचे प्रस्तावना गट विकास अधिकारी बदनापुर ज्योती एन राठोड, यांनी केली. प्रस्तावनामध्ये गट विकास अधिकारी बदनापूर यांनी बदनापुर तालुका हा निती आयोग दिल्ली अंतर्गत आकांक्षित तालुका असल्यामुळे मुलींचे शिक्षण, महिलांची सुरक्षितता, ग्रामस्थांचे आरोग्य, ग्रामस्तरिय संस्थाचे बळकटीकरण करणे, धरती आबा ग्राम उत्कर्ष अभियान व मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान बाबत सविस्तर माहिती दिली, तसेच या कार्यक्रमास उपस्थित सर्वाचे मार्गदर्शन व अभियान बाबतची माहिती आमदार श्री कुचे यांनी दिली.

या कार्यक्रमातंर्गत तालुकास्तरिय राष्ट्रीय पोषण महा चे उद्घाटन आमदारांच्या हस्ते करण्यात आले. तालुक्यातील गेवराई बाजार ही ग्रामपंचायत डिजिटल ग्रामपंचायत झाल्यामुळे आमदार यांच्या हस्ते ग्रामंपचायतीचे ठठ उेवश चे अनावरण करण्यात आले. सर्वांनी गटतट विसरुन ग्रामपंचायतीस पारितोषक मिळावे म्हणून निष्पक्ष प्रयत्न करावे असे आवाहन आमदार यांनी केले. सदर अभियानातंर्गत पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीस आमदार विकास निधीतुन अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे आमदार यांनी सांगितले.

कार्यशाळेच्या नियोजनाबद्दल गट विकास अधिकारी, पंचायत समिती बदनापुर चे ज्योती एन राठोड यांनी अधिकारी/कर्मचारी यांचे कौतुक केले. कार्यक्रमातंर्गत उपस्थित ग्रामस्थांचे आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन ही या कार्यशाळेत करण्यात आलेले होते, सदर कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी तथा नोडल अधिकारी जिल्हा परिषद जयश्री भुसारे, व उप मुख्यकार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) जिल्हा परिषद श्रीमती कोमल कोरे, तसेच तहसिलदार बदनापुर हेमंत तायडे यांची प्रमुख उपस्थिती होते. या तालुकास्तरिय कार्यक्रमास मोठया प्रमाणवर तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती बदनापुर चे माजी सभापती, माजी उपसभापती व माजी सदस्य तसेच केंन्द्र प्रमुख, पर्यवंक्षिका, अंगणवाडी सेविका, आशा सेविका व पंचायत समिती बदनापुर कार्यालयाचे व तालुकास्तरिय कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी हे उपस्थित होते. अशी माहिती गट विकास अधिकारी पंचायत समिती बदनापुर ज्योती राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813